दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ३ रे अंक २७२ वा शुक्रवार दि.०५ एप्रिल २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# सामाजिक सलोखा, शांतता कायम ठेवून जयंती, सण साजरे करा-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

### जिल्हाधिकारी कार्यालयात शांतता समितीची बैठक

लातूर, दि. ०४ : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महात्मा ज्योतीराव फुले जयंती, श्रीराम नवमी आणि रमजान ईद आदी सण, जयंती उत्सव जिल्ह्यात साजरे होणार आहेत. सर्वधर्मीय बांधवांनी एकमेकांच्या भावनांचा आदर करीत हे जयंती, सण साजरे करावेत. या काळात सामाजिक सलोखा, शांतता कायम राखून लातूर जिल्ह्याची परंपरा जोपासावी, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महात्मा ज्योतीराव फुले जयंती, श्रीराम नवमी आणि रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित सर्व समाज प्रतिनिधी, जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी यांचा समावेश असलेल्या शांतता समितीच्या बैठकीत श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्यासह भंते भिक्खु पय्यानंद थेरो, विविध समाज बांधव यावेळी उपस्थित होते.

लातूर जिल्ह्यात सर्व जाती-धर्मीय बांधव एकत्र येवून सण, उत्सव साजरे करतात, ही आजपर्यंतची परंपरा आहे. त्यामुळे आजपर्यंत जिल्ह्यातील सामाजिक सलोखा आणि शांतता टिकून असून हीच परंपरा कायम राखणे, ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. आगामी काळात साजरे होणारे सण, जयंती उत्सव काळात सर्वांनी नियमांचे पालन करून आणि एकमेकांच्या भावनांचा आदर करून उत्साही वातावरणात साजरे करावेत. यानिमित्ताने आयोजित मिरवणूक, शोभायात्रेत कोणताही अनुचित प्रकार घडू नयेत, याबाबत दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी केले.




सण, जयंती उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज आहे. सर्वांनी कायद्याचे आणि आदर्श आचारसंहितेचे पालन करून सण, उत्सव साजरे करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी केले. तसेच जिल्ह्यात शांततामय वातावरणात सण, उत्सव साजरे व्हावेत, यासाठी पोलीस प्रशासनामार्फत उपाययोजना हाती घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

सण, जयंती उत्सव काळातील मिरवणुका, शोभा यात्रा यांना अडथळा होवू नये, यासाठी शहरातील रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येणार आहे. तसेच अडथळा होवू शकणाऱ्या विद्युत वाहिन्या हटविण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली जाईल. मिरवणूक, शोभा यात्रा मार्गावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठीही विविध उपाययोजना करण्यात येणार असल्याचे महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी सांगितले. प्रारंभी जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. बावकर यांनी प्रास्ताविक केले. तसेच पोलीस उपाधीक्षक श्री. फुंदे यांनी आभार मानले.

सर्व समाज बांधवांना मतदार जागृतीची शपथ

शांतता समितीच्या बैठकीला उपस्थित सर्व समाज बांधवांना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या वतीने मतदार जागृतीची शपथ देण्यात आली. स्वीप कक्षाचे रामेश्वर गिल्डा यांनी शपथ वाचन केले. सण, जयंती उत्सव काळात आयोजित विविध उपक्रमांच्या माध्यमातून मतदार जागृती करून जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांनी यावेळी केले.

# मराठा आरक्षणासाठी झटणारे मनोज जरांगे पाटील यांचा प्रवास आता रूपेरी पडद्यावर

### अंतरवाली सराटी येथून 'संघर्षयोद्धा' मनोज जरांगे पाटील चित्रपटाच्या प्रमोशनला सुरुवात

लातूर -- मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी संघर्ष करत असलेले मनोज जरांगे पाटील यांच्या आयुष्याचा वेध घेणारा 'संघर्षयोद्धा' मनोज जरांगे पाटील हा चित्रपट येत्या २६ एप्रिलला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होण्यासाठी आता सज्ज झाला आहे. या चित्रपटाचा मुहूर्त हा जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे करण्यात आला होता आणि आता या चित्रपटाच्या प्रमोशनला ही येथूनच सुरुवात करण्यात आली आहे. शिवाजी दोलताडे यांनी या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी निभावलेली असून सोनाई फिल्म क्रिएशन या निर्मिती संस्थेच्या गोवर्धन दोलताडे यांनी चित्रपटाच्या निर्मितीसह चित्रपटाचं लेखनही केलं आहे. सहनिर्माते रामदास मेदगे, जान्हवी मनोज तांबे, दत्तात्रय लोहकरे कार्तिक दोलताडे , नर्मदा सिनेव्हिजन्स हे आहेत. तर डॉ.सुधीर निकम यांनी संवाद आणि पटकथा लिहिली आहे. या चित्रपटात मनोज जरांगे पाटील यांची मध्यवर्ती भूमिका अभिनेता रोहन पाटील यांनी साकारली असल्याची माहिती गुरुवार दि. ४ एप्रिल रोजी लातूर येथील हॉटेल सुखासागर मध्ये पत्रकार परिषदेत बोलताना संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील चित्रपटाच्या टीमने बोलताना दिली आहे.

संघर्षयोद्धा हा माझा पहिलाच बायोपिक आहे. याआधी मी मुसंडी, मजनू , धुमस असे चित्रपट दिग्दर्शित केले आहेत. एखाद्या काल्पनिक गोष्टींवर चित्रपट बनवणे हे जरा सोपे असते कारण त्यात आपण काही गोष्टी या जोडू शकतो परंतु एखाद्या चालू घडामोडींवर चित्रपट हे तेवढेच कठीण असते. त्यामुळे हा चित्रपट बनवणे माझ्यासाठी मोठे चॅलेंज होते. पण वेळोवेळी मला स्वतः मनोज जरांगे पाटील यांनी आणि त्यांच्या टीमने योग्य ती मदत केली हे मी नक्कीच नमूद करू इच्छितो. आणि त्यामुळेच हे मी शिवधनुष्य पेलू शकलो असे दिग्दर्शक शिवाजी दोलताडे यांनी सांगितले.

मी स्वतःला खुप भाग्यवान समजतो की मनोज जरांगे पाटील यांची व्यक्तिरेखा मला करायला मिळाली. आजवर अनेक वेगवेगळ्या चित्रपटातून मी भूमिका मी केल्या आहेत पण या चित्रपटातील ही व्यक्तिरेखा मला खुप काही देऊन गेली आहे. संघर्षातून उभे राहून आज ते एका वेगळ्या उंचीवर पोहचलेले आहेत. त्यांचे हावभाव आणि अन्य गोष्टींचा मी बारकाईने अभ्यास केला आहे आणि त्यांची सुद्धा मला तेवढीच साथ लाभली आहे. त्यांचा हा प्रेरणादायी प्रवास नक्कीच बघण्यासारखा आहे आणि तुम्ही हा चित्रपट नक्कीच जाऊंन प हाल अशी मला खात्री असल्याचे अभिनेता रोहन पाटील यांनी सांगितले

मनोज जरांगे पाटील यांचा संघर्ष हा खडतर असून संपूर्ण जगाला समजावा यासाठी मी या चित्रपटाची निर्मिति करण्याचा निर्णय घेतला. केवळ व्यक्तीसाठी न लढता समाजासाठी आज ते लढत आहेत ही छोटी गोष्ट नाही. त्यांनी आजवर अनेक उपषोण केली हार मानली नाही. माझे मी भाग्य समजतो की या चित्रपटाची निर्मिति करण्याची सुवर्णसंधी मला मिळाली असे चित्रपटाचे निर्माते गोवर्धन दोलताडे यांनी सांगितले

काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाच्या टीज़रला सोशल मीडियावर तुफान प्रतिसाद मिळाला होता आणि त्यानंतर सुप्रसिद्ध गायक अजय गोगावले यांच्या सुमधुर आवाजातील हृदयाला भिडणाऱ्या उधळीन जीव... या गीताने रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले आहे. या चित्रपटात अभिनेता संदीप पाठक, सागर कारंडे, अरबाज शेख, अभिनेते मोहन जोशी, श्रीनिवास पोकळे, संजय कुलकर्णी,




अभिनेत्री सुरभी हांडे, माधवी जुवेकर, विजय मिश्रा, विनीत भोंडे, सुनील गोडबोले, माधव अभ्यंकर, सोमनाथ अवघडे , किशोर चौगुले , सिद्धेश्वर झाडबुके, उर्मिला डांगे यांच्या ही प्रमुख भूमिका आहेत.

# भाजप नेत्यांच्या डावपेचांना बंडखोरांचा काटशह



बेंगळुरू : वृत्तसंस्था कर्नाटक भाजपमधील ज्येष्ठ नेत्यांची बंडखोरी अधिकाधिक उग्र स्वरूप धारण करीत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा कर्नाटक दौरा आणि बंडखोर नेत्यांशी वन टू वन चर्चा होऊनही असंतोषाची धग काही थांबण्याचे नाव घेत नाही. उल्लेखनिय म्हणजे येडियुराप्पा यांची देखील भाजप वरील पकड सैल पडली आहे. त्यामुळे भाजपला कर्नाटकात किमान डझनभर बंडखोरांच्या आव्हानाचा सामना करावा लागत आहे.गेल्या निवडणुकीत भाजपने कर्नाटकात २८ पैकी २६ जागा जिंकल्या होत्या, मात्र यावेळी बंडखोर आणि असंतुष्ट भाजप नेते किमान डझनभर जागांवर भाजपचा खेळ बिघडविण्याचा प्रयत्न करत आहेत. ही परिस्थिती पाहून अमित शाह यांनी स्वत: कर्नाटकात धाव घेतली. नाराज नेत्यांना शांती सूक्त ऐकवण्याचा प्रयत्न केला. अमित शाह यांनी बंगळुरूला जाऊन नाराज नेत्यांशी वन टू वन चर्चा केली. तथपि, भाजपचे ज्येष्ठ नेते के. एस. ईश्वरप्पा शिवमोगा येथून बी.एस. येडियुरप्पा यांचे पुत्र राघवेंद्र यांच्या विरोधात निवडणूक लढविण्यावर ठाम आहेत.संगन्ना कराडी यांना कोप्पलमधून तिकीट नाकारल्यानंतर त्यांनी भाजप उमेदवाराला पराभूत करण्याची शपथ घेतली आहे. तुमकूरमधील भाजपचे उमेदवार व्ही. सोमन्ना यांना बाहेरचे उमेदवार असल्याचे सांगत माजी मंत्री मधुस्वामी विरोध करत आहेत.सदानंद गौडाही नाराज बंगळुरू उत्तरमध्ये माजी केंद्रीय मंत्री सदानंद गौडा तिकीट नाकारल्याने नाराज आहेत. म्हैसूरमधून प्रताप सिम्हा यांना तिकीट नाकारण्यात आले. बी.एस. येडियुरप्पा यांची पक्षात पहिल्यासारखी पकड राहिलेली नाही.

### रेणापूर तालुका हा काँग्रेस पक्षाच्या मागे नेहमीच खंबीरपणे उभा

# आमदार धिरज देशमुख यांचा विश्वास; संवाद बैठकांच्या माध्यमातून काँग्रेसचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या गाठीभेटी

लातूर : मतदारसंघ पुनर्रचना होऊन लातूर ग्रामीण मतदारसंघात आलेला रेणापूर तालुका हा काँग्रेस पक्षाच्या मागे नेहमीच खंबीरपणे उभा आहे. जिल्हा परिषद, साखर कारखाने, जिल्हा बँक यामुळे लातूर बरोबर रेणापूर तालुक्याचाही विकास झाला. त्यामुळे या तालुक्याने काँग्रेसच्या विचारांना नेहमी बळ देण्याचे काम केले, असे प्रतिपादन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी केले. विधानसभा निवडणुकीत मतदानाच्या रूपाने मला भरभरून आशीर्वाद मिळाला. तसाच आशीर्वाद डॉ. शिवाजी काळगे यांना द्या, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघामधील रेणापूर शहरातील नेहरुनगर, हाकेतांडा, राजेवाडी, रूपचंदनगर, रेणुकानगर, ओमनगर, रामनगर, संभाजीनगर, काळेवाडी, हणमंतवाडी, हणमंतवाडी तांडा आदीसह विविध प्रभागांमध्ये संवाद बैठका घेवून आमदार धिरज देशमुख आणि काँग्रेस, महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांनी पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याशी संवाद साधला. यावेळी शेतकरी, महिला, तरुणांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवून डॉ. शिवाजी काळगे यांना बहुमताने विजयी करू, असा संकल्प केला. आमदार धिरज देशमुख म्हणाले, भाजप सरकारच्या महागाईमुळे महिला भगिनी वैतागल्या आहेत. घरांचे



बजेट बिघडल्याने जगणे मुश्किल झाले आहे. महिलांचे अनेक प्रश्न आहेत. ते प्रश्न महिलांना सोबत घेऊन काँग्रेसच सोडवू शकते, असा महिलांना विश्वास आहे. त्यामुळे महिलांनी ही निवडणूक आता आपल्या हातात घेतली आहे. म्हणून आपला, महाविकास आघाडीचा विजय निश्चित आहे. केवळ महिलाच नव्हे शेतकरी, मजूर, तरुण, विद्यार्थी, उद्योजक, वाहनचालक असे अनेक घटक सरकारच्या जाचक धोरणांमुळे नाराज आहेत. एकमेकांत भांडणे लावण्याचे, पक्ष फोडाफोडीचे कामही सरकारने केले आहे. हे जनतेला आवडलेले नाही. या सगळ्याचे पडसाद या निवडणुकीत उमटतील याची खात्री आहे, असे आमदार धिरज देशमुख यांनी सांगितले. ही निवडणुकीत सत्यासाठी आहे. आम्ही सत्याच्या बाजूने उभे आहोत. त्यामुळे या लोकसभा निवडणुकीत आपला मतदानाचा हक्क बजावून मला विजयी करावे, असे आवाहन डॉ. शिवाजी काळगे यांनी केले. याप्रसंगी किरण जाधव, प्रमोद जाधव, अनुप शेळके, संजय शेटे, पृथ्वीराज शिरसाठ, अनंतराव देशमुख, संभाजी रेड्डी, उमाकांत खलंग्रे, सचिन दाताळ, स्वाती सोमाणी, शेषराव हाके, इम्रान सय्यद, रमेश सूर्यवंशी, हणमंत पवार, उमेश सोमाणी, पूजा इगे, रुपेश चक्रे, सतीश बिराजदार, हरिभाऊ साबदे, गोविंद पाटील, पंकुडे, अशोक राठोड, भूषण पनुरे, पाशा शेख, पद्म पाटील, अजय चक्रे, प्रवीण माने, प्रमोद कापसे, विश्वनाथ कागले, गणेश कलाल, बाळासाहेब करमुडे, प्रदीप काळे, गुलाब चव्हाण, तुकाराम कोल्हे, प्रशांत आकनगिरे, रवी आकनगिरे, सूर्यकांत मोटेगावकर, रहीम पठाण, दासू राठोड, आव्हाड ताई, बाळासाहेब पाटील, राजकुमार पाटील, पप्पू सिरसकर, लिंबराज राठोड, प्रदीप राठोड, विठ्ठल राठोड, सतीश चव्हाण, प्रेमचंद पवार, निशांत वाघमारे, नानासाहेब काळे, विजय काळे, रामदास जाधव, गणेश आकनगिरे, कृष्णा जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# सोनवणेंनी प्रितम मुंडेंविरुध्द घेतले होते ५ लाखांहून अधिक मते

बीड : बीड लोकसभा मतदारसंघात यंदाची निवडणूक गतवर्षीपेक्षा अधिक लक्षवेधी ठरणार आहे. कारण, राज्याच्या बदललेल्या राजकीय समीकरणामुळे बीड जिल्ह्यातही राजकीय समीकरणे बदलली आहेत. गतवर्षी एकमेकांविरुद्ध असलेले बहिण-भाऊ यंदाच्या निवडणुकीत एकत्र आहेत. त्यातच, भाजपाने प्रितम मुंडेऐवजी पंकजा मुंडेंना बीडमधून लोकसभेची उमेदवारी दिली आहे. त्यामुळे, पंकजा मुंडेंविरुद्ध महाविकास आघाडीचा उमेदवार कोण, याची सर्वांनाच उत्सुकता होती. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाने आपला उमेदवार जाहीर केला असून बीडमधून बजरंग सोनवणेंना उमेदवारी दिली आहे. सोनवणे यांनी गत २०१९ च्या निवडणुकीत प्रितम मुंडेंना चांगलीच फाईट दिली होती.दिवंगत भाजपा नेते गोपीनाथ मुंडेंच्या निधनानंतर झालेल्या २०१४ सालच्या लोकसभा पोटनिवडणुकीमध्ये प्रीतम मुंडे यांनी जवळपास ७ लाखांच्या विक्रमी मताधिक्याने काँग्रेसचे अशोकराव पाटील यांचा पराभव केला होता. मात्र, गतनिवडणुकीत नवख्या बजरंग सोनवणेंना त्यांना चांगलेच आव्हान दिले. त्यामुळे, १ लाख ६९ हजार ५७ मतांनी प्रितम मुंडे निवडून आल्या होत्या. यंदाच्या निवडणुकीत पुन्हा एकदा बजरंग सोनवणे लोकसभेच्या मैदानात उतरले आहेत. मात्र, त्यांचे मित्र धनंजय मुंडे हे यंदा त्यांच्याविरुद्ध प्रचाराच्या मैदानात असतील. तर, समोर प्रितम मुंडेऐवजी पंकजा मुंडेंचे अव्हान आहे. त्यामुळे, बजरंग सोनवणे यांना ही निवडणूक सोपी नाही. मात्र, डोक्यावर शरद पवारांचा हात आणि भावनिक साद घेऊन बजरंग सोनवणे मैदानात उतरतील, असेच दिसून येते.सोशल मीडियावर कडवी लढत वाटत असताना प्रीतम मुंडे यांनी जवळपास पावणेदोन लाखांच्या मताधिक्याने मिळवलेल्या विजयाने सर्वांचेच अंदाज फोल ठरले. मात्र, यंदा राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा जोमात असून बीड हेच त्याचे केंद्रस्थान मानले जाते. त्यामुळे, यंदाच्या बीडमधील लोकसभा निवडणुकांकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. त्यात, शरद पवार यांनी ज्योती मेटेंना तिकीट न देता बजरंग सोनवणेंना मैदानात उतरवले आहे. केज, परळी, बीड, आष्टी, गेवराई आणि माजलगाव या सहा विधानसभा मतदारसंघातून बीडसाठी मतदान होते. त्यामुळे, यंदा प्रतिम मुंडे मोठ्या मताधिक्क्याने निवडून येतील, की त्यांना महाविकास आघाडीचा धक्का बसेल, हे निवडणुकींनंतरच स्पष्ट होईल. मात्र, येथून वंचित बहुजन आघाडीचाही फॅक्टर महत्त्वाचा ठरणार आहे. वंचितने बीडमधून अद्याप उमेदवार दिलेला नाही. त्यामुळे, पुढील काही दिवसांत तेही चित्र स्पष्ट होईल.

## संपादकीय....

# चीनची खुमखुमी

भांडवलशाहीप्रधान चीनमध्ये कम्युनिस्ट पक्षाची हुकूमशाही असून, रशियाप्रमाणेच तेथे लोकशाही औषधालाही अस्तित्वात नाही. शी जिनपिंग हे चीनचे राष्ट्राध्यक्ष असून, या पदावर आपण तहहयात राहावे, अशी त्यांची इच्छा आहे; परंतु गेल्या महिन्यात जिनपिंग यांची बीजिंगच्या लष्करी इस्पितळात वैद्यकीय चाचणी घेतली आणि त्यावेळी त्यांना कर्करोग झाल्याचे समोर आल्याची बातमी एका नर्सचा हवाला देऊन बाहेर आली; परंतु ही बातमी खरी की खोटी, हे कळायला मार्ग नाही. त्यानंतर त्यांची पत्नी आणि पीपल्स लिबरेशन आर्मीमधील (पीएलए) माजी मेजर जनरल पेंग लीयूआन यांना कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिटब्युरोत बढती दिली जाणार असल्याचीही अफवा होती. चीनमध्ये इंटरनेटवर कडक नियंत्रण असून, अफवा पसरवणार्यांवरही बारीक लक्ष ठेवले जाते. शिवाय सरकारविरोधी आवाज उठवणार्या लेखक, पत्रकार व विचारवंतांना किंवा कुठल्याही प्रकारच्या बंडखोरांना अचानकपणे 'अदृश्य' केले जाते. एकेकाळचे जिनपिंग यांचे पट्टशिष्य आणि परराष्ट्रमंत्री किन गांग हे परराष्ट्रमंत्री असतानाच, गेल्या वर्षी गायब झाले आणि त्यांच्या जागी त्यांच्या आधीचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांची परत नेमणूक झाली. संरक्षणमंत्री ली शुफांग यांनाही पदावरून हाकलले आणि नंतर ते कुठेही दिसले नाहीत.परराष्ट्र धोरणाबाबतही दिवसेंदिवस चीनचा ऊतमात वाढत आहे. भारताचा अविभाज्य भाग असलेल्या अरुणाचल प्रदेशवर हक्क सांगत, चीनने त्या राज्यातील वेगवेगळ्या स्थळांना ३० नवीन नावे बहाल केली आहेत. चीनने अरुणाचल प्रदेशला 'झांगनान' असे नाव दिले आहे. तो दक्षिण तिबेटचा भाग असल्याचा चीनचा दावा आहे. खोडसाळपणा हा चीनच्या अंगी मुरलेला असून, अरुणाचल प्रदेशला भारताच्या कोणत्याही नेत्याने वा मंत्र्याने भेट दिली, तरीही चीनची आरडाओरड सुरू असते; परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी फिकीर न करता त्या भागाचे दौरे केले आहेत. एवढेच नव्हे, तर भारताचे लष्करप्रमुखही अरुणाचलचा दौरा करून तेथील संरक्षण व्यवस्थेची पाहणी करत असतात. चीनला लडाखही 'आपलाच' वाटतो; पण चीनला काय वाटते, यावर गोष्टी ठरत नाहीत. अरुणाचलवर हक्क सांगत, तेथील सहा ठिकाणांना नवी नावे देण्याची चूक चीनने प्रथम २०१७ साली केली आणि आजपर्यंत अशा नवीन नावांच्या चार याद्या प्रसिद्ध केल्या आहेत. पूर्व लडाखमधील सीमाप्रश्नावरूनही दोन्ही देशांत सातत्याने संघर्ष होत असतो. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरून लष्कर मागे घेण्याचे आश्वासन देऊनही चीन ते पाळत नाही. भारत आणि बांगलादेशमधील संबंध जवळचे असले, तरीही चीन बांगलादेशमध्ये पाणबुड्यांसाठी तळ बनवत असून, बांगलादेशने भारतापेक्षा आपल्याला जवळचे मित्र मानावे, यासाठी चीनची धडपड सुरू आहे. आता अरुणाचल हा भारताचाच आहे व भविष्यातही राहणार आहे. तेथील स्थळांची नावे बदलून चीनच्या हाती काहीही लागणार नाही, असे खडे बोल परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी चीनला सुनावले आहेत. आज मी तुमच्या घराचे नाव बदलले, तर ते माझे होईल का? आमचे सैन्य प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर तैनात आहे, असा खणखणीत इशाराही जयशंकर यांनी दिला आहे. गेल्या वर्षी मोदी यांनी अरुणाचलचा दौरा करून, तवांग येथील सेला टनेलचे उद्घाटन केले होते. रणनीतीच्या दृष्टीने हे योग्य पाऊल असल्याचे तेव्हा मानले गेले होते.अरुणाचल हा भारताचा अविभाज्य भाग असल्याचे अमेरिकेनेही मान्य केले आहे. चीनने जर तेथे अतिक्रमण केले, तर आम्ही त्याचा विरोधच करू, असे अमेरिकेने स्पष्ट केले आहे. अमेरिकेच्या या भूमिकेमुळे चीन खवळला असून, अमेरिका भारताला आमच्या विरोधात चिथावणी देत असल्याचा भंपक आरोपही चीनने केला आहे. चीन आणि भारतात अमेरिका भांडण लावत आहे आणि हाच अमेरिकेचा इतिहास असल्याचे चीनच्या संरक्षण मंत्रालयाचे प्रवक्ते, कर्नल वू कियान यांनी म्हटले आहे. खरे तर चीनच कुरापत काढत असून, अशावेळी भारताच्या रास्त भूमिकेस अमेरिकेने नैतिक पठिंबा देण्याला 'चिथावणी देणे' असे कसे म्हणता येईल? चीनने भारताच्या हजारो चौरस फूट जमिनीवर अतिक्रमण केले आहे. त्याबद्दल मोदी चकार शब्दही काढत नाहीत, अशी टीका माजी संरक्षणमंत्री शरद पवार यांनी केली आहे. पवार हे संरक्षणमंत्री असताना चीनने अतिक्रमण केलेली भारताची एक इंच तरी भूमी परत मिळवण्यात त्यांना यश आले होते का? तसा त्यांनी प्रयत्न तरी केला होता का? पवारांचे आदर्श असलेल्या पंडित नेहरूंनी चीनच्या बाबतीत म्हटले होते की, ते स्वतः काल्पनिक जगात राहत होते, त्यामुळेच त्यांनी १९५४ मध्ये चीनबरोबर पंचशील करार केला. तिबेटमधील भारतीय सैन्यदल परत बोलावले. तिबेट हा चीनचा अविभाज्य भाग आहे, हे भारताने मान्य केले. नेहरूंनी देशातील मुख्यमंत्र्यांना १५ नोव्हेंबर, १९५४ रोजी लिहिलेल्या पत्रात चीनचे पंतप्रधान चौ एन लाय यांच्याशी झालेल्या चर्चेचा वृत्तांत कळवला होता. त्यावेळी चीनने प्रसिद्ध केलेले सीमाभागातील नकाशे भारताचा बराच भाग चीनचा असल्याचे दाखवत होते, याचा उल्लेखही या पत्रात होता; परंतु चीनबाबत नेहरू गाफील राहिल्यामुळे १९६२ मध्ये चिनी आक्रमणामुळे भारताचे प्रचंड नुकसान झाले. उलट मोदी यांनी सत्तेवर आल्यानंतर चीनशी संबंध सुधारण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला; परंतु डोकलाम असो अथवा गलवान खोरे, तेथील चिनी आगळिकीला जशास तसे उत्तरही त्यांनी दिले. तसेच अनेक चिनी ॲप्सवर बंदी घालून चीनला इशाराही दिला. हे सारे लक्षात न घेता, देशाच्या संरक्षणाच्या बाबतीत आपण राजकारण करत नाही, या भूमिकेला पवार स्वतः छेद देत आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी तर चीनबाबत केंद्र सरकारवर तोंडाला येईल ते आरोप करत असतात; परंतु चीनला चोख उत्तर देण्यास केंद्र सरकार समर्थ असून, अशावेळी संकुचित राजकारणाला थारा न देता, केंद्राच्या मागे विरोधकांनीही ठामपणे उभे राहणे आवश्यक आहे.

# संवेदनशील मनाचे साहित्यिक : प्रज्ञाधर ढवळे

नांदेडच्या फुले आंबेडकरी साहित्य चळवळीत मागील एक दशकाहून अधिक काळ सक्रिय असणाऱ्या साहित्यिकांमध्ये कवी, समीक्षक प्रज्ञाधर ढवळे यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. विषमतावादी समाजव्यवस्था आणि मनुवादी विचारसंस्कृतीचा विध्वंस करण्याचा विद्रोहच त्यांच्या ठायी असल्यामुळे त्यांच्यातील आंबेडकरी 'पँथर कार्यकर्त्याचा' गुण स्वस्थ बसू देत नाही. अत्यंत संवेदनशील मनाच्या आणि निधड्या छातीच्या म्हणजेच पर्यायाने आंबेडकरी बाण्याच्या साहित्यिक मित्राच्या जन्मदिनाच्या निमित्ताने त्यांच्या अत्यंत लाघवी व्यक्तीमत्वाविषयी माझे अनुभव कथन करण्याचा अल्पसा शब्दप्रपंच मी इथे केलेला आहे.

प्रज्ञाधर ढवळे आणि माझी भेट नेमकी कुठे आणि केव्हा झाली हे माझ्या आता स्मरणात नाही. याबाबत मला फारसं आठवत नसलं तरी दहा बारा वर्षांपूर्वी सत्यशोधक विचार मंचाच्या एखाद्या साहित्य संमेलनातली ही भेट असावी. परंतु आमची मैत्री होऊन एक तपाचा कालखंड सरकला आहे, हे मात्र नक्की. 'साहित्य की बात जहाँ, कवी पहुँचे वहाँ! बहुदा आंबेडकरवादी साहित्य संमेलनाच्या धामधुमीच्या काळात या गंगाधर ढवळे नावाच्या ज्वलजहाल विद्रोही कवीमित्राची एंट्री झाली असावी. मग पुढच्या काळात माझ्या साहित्यप्रवासात खूपच महत्त्वपूर्ण ठरली आणि मैत्री सुद्धा खूप घट्ट झाली आहे, या विधानाला ते निःसंशय दुजोरा देतील. तसेच गंगाधर ढवळे हे नंतरच्या काळात प्रज्ञाधर ढवळे कसे झाले हे या लेखात पुढे ओघाने आले आहे.

सप्तरंगी साहित्य मंडळ, महाराष्ट्र या नव्या साहित्य चळवळीत काम करीत असून नवोदितांना मंच उपलब्ध करुन देणारं हे साहित्यपीठ मराठी भाषेला समृद्ध करण्यासाठी नव्या उमेदीनं उभं राहिलं आहे. लेखन, समीक्षण, काव्यवाचन, साहित्य संमेलने, पुस्तक प्रकाशन आदी साहित्य कलापांच्या माध्यमातून सप्तरंगी साहित्य मंडळाने यशोशिखर गाठले आहे. ज्येष्ठ असो वा नवोदित अशा सर्व कवी कवयित्री तथा साहित्यिक मित्रांना सोबत घेऊन शहरी किंवा ग्रामीण असा कोणताही भेद न करता हा मराठी मुलुख साहित्यसुंगधाने व्यापून टाकला आहे. याचे मोठेपण प्रज्ञाधरांकडे आपोआपच चालून जाते. काव्य पौर्णिमा ही ढवळे यांनी जन्माला घातलेली प्रज्ञानी संहिता. आत्तापर्यंत ऐंशीहून अधिक काव्य पौर्णिमा शहर तथा जिल्हाभरात सार्जय़ा झालेल्या आहेत. कुतुहलाचा आणि औत्सुक्याचा भाग म्हणजे ही काव्य पौर्णिमा कुठे कोणत्या ठिकाणी आयोजित केली जाईल याचा काही नेम नसतो. बुद्ध विहारात तसेच एखाद्या मंदिरात, वृद्धाश्रमात, मूक बधिर विद्यालयात कुणाच्या गच्चीवर तर कधी किल्ल्यात वा नदीच्या किनाऱ्यावर अशा विविध ठिकाणी या काव्य पौर्णिमा सार्जय़ा झालेल्या आहेत. यासाठी त्यांना स्मशानभूमीचीही जागा पुरेशी ठरलेली नाही, हे इथे नमूद करावे लागेल. काव्य पौर्णिमा या कविसंमेलनाच्या कार्यक्रमातून अनेक तारक तारकांना चांद्र पौर्णिमेच्या प्रकाशात उजळून काढले आहे. मानवी जीवनाचं जळजळीत वास्तव मांडण्याची ताकद कवी साहित्यिकांच्या सृजनशील मनाला यावी हा या मागचा उद्देश काव्य पौर्णिमेचा संकल्पक म्हणून ढवळेंचा असला पाहिजे. हे त्यांच्या कार्यशैलीचे वेगळेपण आहे, ते याठिकाणी अधोरेखित झाल्यावाचून रहात नाही.

नवोदितांना लिहितं करण्याचा प्रयत्न असो वा नांदेड जिल्ह्यातीलच नव्हे तर विदर्भ, मराठवाड्यातील साहित्य संस्थांना पाठबळ देण्याचा सरांचा सातत्याने प्रयत्न राहिलेला आहे. माझ्या पुढाकारातून आयोजित होणाऱ्या परिषदा, साहित्य संमेलने, महोत्सवांच्या यशस्वी आयोजनात ढवळे यांचे मोठे योगदान राहिले आहे. संयोजन समिताचा सदस्य ते स्वागताध्यक्ष अशी सर्व पदे स्विकारुन आपल्या कार्याने त्या पदांना यथोचित न्याय दिलेला आहे. हटकर, माझ्यापासून सुरुवात करा, तुम्ही नियोजन करा! मी सारा कार्यभाग सांभाळून घेतो. सरांच्या या कृतीयुक्त पाठबळांच्या सादातून अनेक ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन सत्यशोधक विचार मंचाच्या माध्यमातून यशस्वीरित्या संपन्न झाले आहे. यामुळे अनेक ख्यातनाम आंबेडकरी साहित्यिक विचारवंतांच्या मार्गदर्शनाने साहित्य, सांस्कृतिक चळवळ प्रवाहित राहिली आहे, याचं श्रेय ढवळे सरांना देणं अपरिहार्य ठरतं. यात कुणाचं दुमत नसावं.

नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील कुरुळा नावाचं सरांचं जन्मगाव. ग्रामीण भागातील सर्वसामान्यांचं जीवन, त्यांचं जगणं, त्यांचे प्रश्न, तिथे जिवंत असणाऱ्या रुढी परंपरा, श्रद्धा अंधश्रद्धा इत्यादी बारीकसारीक गोष्टींचं निरीक्षण, परीक्षण सूक्ष्म रीतीने सरांनी केलेलं असून बालपणात आणि शालेय जीवनाच्या आरंभीच्या टप्प्यात वाट्याला आलेल्या सुख दुःखाच्या, मानापमानाच्या, सामाजिक परिस्थितीचे दाहक अनुभव घेतल्यामुळे त्यांच्या सद्य जीवनाची यशस्वी वाटचाल सुंदर होण्यासाठी प्रेरक ठरली असे मला वाटते. त्यांच्या लेखनात या सार्य़ांचे समायोजन झाल्याचे दिसते. त्यांच्या लिखाणावर सुप्रसिद्ध विचारवंत यशवंत मनोहर यांच्या विचारांची छाप दिसून येते. आम्ही अगदी मनोहर सरांच्या शब्दांवर जगतो, असेही ते म्हणतात. त्यांनीच आमच्या गंगाधर ढवळे यांना प्रज्ञाधर ढवळे या प्रज्ञानी सौंदर्याचा लेप दिलेला आहे. म्हणूनच ते चंदनाप्रमाणे सर्वत्र दरवळत आहेत.

आदर्श टिचर, वात्सल्यरुपी फादर, प्रखर ओरियेटर, उत्तम ऑर्गनायझर, कार्यक्रमांचे दृष्टा डायरेक्टर, व्यवस्थेवर तुटुन पडणारा फायटर अशा सप्तरंगांच्या वैविध्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्णतेने ओतप्रोत भरलेले असे अनेक कंगोरे असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून सरांची ओळख आहे. आपल्या प्रतिभाशाली व्यक्तिमत्वाची ओळख म्हणून ढवळे यांचा सप्तरंगी साहित्य मंडळाच्या निर्मितीतील महत्वाचा सहभाग आहे. दोन चार वर्षांपूर्वी कवी साहित्यिक अनुरत्न वाघमारे, नागोराव डोंगरे, पांडुरंग कोकुलवार, मारोती कदम, कैलास धुतराज, शंकर गच्चे, बाबुराव पाईकराव, रुपाली वागरे–वैद्य यांना सोबत घेऊन सप्तरंगी साहित्य मंडळाची मुहूर्तमेढ रोवली. आता प्रशांत गवळे, रणजित गोणारकर, चंद्रकांत कदम, दत्ताहरी कदम, गौतम कांबळे, प्रकाश ढवळे, यशवंत भवरे, थोरात बंधू, शरदचंद्र हयातनगरकर, प्रल्हाद घोरबांड, गजानन वानखेडे, लकी बकाल, उमेश वंजारे, गोविंद बामणे, जळबा सोनकांबळे, सुभाष लोखंडे, आनंद गोडबोले, भय्यासाहेब गोडबोले, मंगल सोनकांबळे, अनिल थोरात आदी सहकार्य़ांच्या साथ सोबतीने सप्तरंगी साहित्य मंडळाची वेल बहरली आहे, हे मी बघत आलोय.

अत्यंत संवेदनशील, परखड मत मांडणारा, आंबेडकरी विचारधारेने झपाटलेला आणि लेखणीतून व्यक्त होण्यासाठी शाब्दिक ताकद असलेला समीक्षक, चिंतक सद्याच्या काळात विरळ असल्यामुळे ढवळे ह्यांसारखे आंबेडकरवादी नोकरशाह स्वयंस्फूर्तीने चळवळीच्या मजबूतीसाठी पुढे येण्याची गरज आहे. 'आपलं घर, आपली मुले बाळे, आपला सुखी संसार, आपलं मोठेपण, आपला बंगला, आपला महाल' या परिघाच्याबाहेर पडलं पाहिजे आणि समाजातील बांधव अजूनही हालाखीच्या अवस्थेत जीवन व्यतीत करीत आहेत, त्यांना दलदलीतून बाहेर काढण्यासाठी यशाशक्ती प्रयत्न केले पाहिजेत. ही भूमिका घेणं समाजाला अपेक्षित आहे. आप्पलपोटी वृत्तीचा त्याग केला पाहिजे. सामाजिक बांधिलकीचा वसा आणि आंबेडकरी विचारांचा वसा घेऊन साहित्य चळवळीच्या माध्यमातून तसेच आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने चालवत असलेली चळवळ वैचारिक प्रबोधनाचे नवे पीक घेणारी आहे. परिवर्तनाचा नवा आशय मांडणारी आहे. त्यांच्या सामाजिक सांस्कृतिक तथा साहित्यिक चळवळीतील कार्याला खंबीरपणे साथ देणारी आमची ताई आयु.निशिगंधा ढवळे यांचेही योगदान दुर्लक्षित करता येणार नाही. त्यांच्या त्यागाची नोंद घेणे अपरिहार्यच आहे.

यशवंत मनोहरांच्या या प्रज्ञाधरांनी आंबेडकरी चळवळ आणि समकालीन सामाजिक वास्तवाची समीक्षा करावी, त्यांनी खूप खूप लिहावं, सभा संमेलनातून, बैठकांतून आणि साहित्याच्या मंचावरून परखड बोलावं... त्याचबरोबर साहित्य चळवळीचा झरा प्रसवत ठेवावा, यासाठी प्रज्ञाधर ढवळे यांना निरोगी, निरामय, दीर्घायुष्य लाभो अशा प्रकारच्या मंगल कामना व्यक्त करुन आयुष्याचं विस्तीर्ण आभाळ त्यांच्या नेहमीच स्वागतासाठी सज्ज राहील अशी अपेक्षा नोंदवून ठेवतो. धन्यवाद!

********–

**कोंडदेव हटकर**
**(अध्यक्ष, सत्यशोधक विचार मंच, नांदेड)**
**मो. ९५२७४७४०८०**

# महाराष्ट्र सुरक्षा बलाचे धाडसी कर्तव्यदक्ष अधिकारी विक्रमवीर सुनिल होरंबे.पुन्हा एकदा वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्ड –२०२४ मध्ये नोंद

नि:स्वार्थी,नि:स्पृह भावनेने काम करणार्या समाजरक्षकांमुळे समाजातील असमतोलाची दरी काही अंशी कमी होताना दिसते.समाजमन आणि समाजभान जपणारे असे मोजकेच रक्षक आपल्यामध्ये नजरेस पडतात. 'केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे,' या उक्तीनुसार कोणतीही गोष्ट तडीस न्यायची असेल, तर त्यासाठी प्रचंड मेहनत आणि श्रम हे अगदी अपरिहार्य.या स्पर्धात्मक समाजात स्वतःला घडवण्याबरोबरच आपल्या सोबतच्या सहकार्यांनादेखील मोठे करणारे समाजसेवक तसे विरळाच.पण, जेव्हा असे समाजाचे रक्षक जेव्हा समाजात सक्रिय असतात,तेव्हा समाजातील रंजल्या–गांजल्या सामाजिक घटकांमध्ये एकमेकांबद्दल प्रेम, आपुलकीची भावना निर्माण होण्यास हातभार लागतो. याच धर्तीवर समाजसमर्पित काम करणारे एक समाजसेवेचे रक्षक म्हणजे महाराष्ट्र सुरक्षा बलाचे कर्तव्यदक्ष आणि धाडसी अधिकारी सुनिल होरंबे!

सुनिल होरंबे हे आपल्या शालेय जीवनात आरएसपी,स्काऊट गाईडमध्ये असताना त्यांना गणपती उत्सव,माहीम दर्गा,माहीम चर्च या ठिकाणी वाहतूक नियंत्रण सरावाकरिता व प्रशिक्षणकरिता नेत असत..या वेळी ते रस्त्यावर भीक मागणाऱ्या व्यक्तींना आणि कपडे न घातलेल्या उघड्या लहान मुलांना पाहत असत,तर शाळेत येता–जाताही त्यांच्या नजरेत हि गरिबी नजरेस पडत असे,यातील काही मुलं भीक मागून तर काहीजण कुणी दिलेले शीळ,उष्ट खाऊन जगताना त्यांनी पाहिलं आणि त्यांच्या मनात गरिबी घर करून गेली ती आतापर्यंत.. तेही अशाच गरिबीतून इथपर्यंत पोहोचले असल्यामुळे सांगतात कि गरीब म्हणजे अशी परिस्थिती आहे कि ज्यामध्ये भौतिक गोष्टी नसतात आणि श्रीमंत अशी स्थिती असते कि ज्यात प्रत्येकाला त्याच्या गरजेच्या भौतिक गोष्टी असतात.श्रीमंत असा आहे जेव्हा टेबलावर नेहमीच अन्न असते,तेव्हा कुटुंबाच्या गरजा काळजी घेतात,आणि सुखसोयींचा आनंद होतो,तर गरीबी अशी असते जेव्हा अन्न अगदी दुर्मिळ असते आणि प्रत्येकाने कुटुंबासाठी टिकून राहावे लागते.



होरंबे यांनी सामाजिक क्षेत्रात तसेच खात्याअंतर्गत काम करताना राजकारणी आणि भ्रष्टाचारी सिस्टममुळे गरीबीची कशा प्रकारे फरपड केली जाते हे आतापर्यंत उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे.त्यामुळेच सुनिल होरंबे यांना कोणत्याही गरीब व्यक्तीवर अन्याय,अत्याचार झालेला सहन होत नाही.आपल्या खात्यात प्रामाणिकपणे आणि निष्ठावंत राहून,आपले कर्तव्य बजावून या गरीबीसाठी जेवढी सेवा करता येईल तेवढी करायची,अन्याय करणाऱ्यांना त्यांचा मार्ग दाखवायचा आणि समाधानाने जगायचं एवढचं ते सांगतात,आपल्या खात्यातील जवानांच्या बद्दलही त्यांना खूप तळमळ असून ते प्रत्येक पोस्टिंगच्या ठिकाणी कडक स्वरूपाचा स्वभाव व शिस्तीसोबत आपल्या अधिपत्याखाली काम करणाऱ्या जवानांकडून उत्तमप्रकारे कार्य करून घेऊन त्यांची काळजीही तेवढी घेतात. त्यांनी कोविड काळात आपले कर्तव्य सांभाळून कोविड रुग्णांसाठी प्लाझ्मादान व रक्तदान करण्यास इच्छुक असणाऱ्या व्यक्तींना शोधून गरीब रुग्णांसाठी अत्यंत मोलाचे असे मदतकार्य केले.ते वर्षे १९९७ पासून ते आतापर्यंत रक्तदान करत आले असून त्यांची गरिबांचा रक्तदाता म्हणून त्यांची ख्याती आहे.त्यांनी वर्षे–२०२० च्या कोरोना कालावधीत गरीब व्यक्तींना हॉस्पिटलपर्यंत नेणे,त्यांना रक्त उपलब्ध करून देणे,रुग्णवाहिका उपलब्ध करून देणे,अडीअडचणी जाणून घेऊन त्यांना जेवढे जमेल तेवढे मदतकार्य केलेले आहे,त्यांनी आतापर्यंत १०२ वेळा रक्तदान केलेले असून ८१ गरजू लोकांना रक्त देऊन त्यांना जीवदान दिलेले आहे. सुनिल होरंबे,हे गोरेगाव,मुंबई येथे राहत असून ते मूळचे कोकणातील रत्नागिरीचे आहेत,त्यांचा जन्म त्यांच्या मूळ गावी एका मध्यमवर्गीय कुटुंबात झालेला असून त्यांचे बालपण मुंबईच्या प्रसिद्ध आणि आशिया खंडातील सर्वात मोठ्या धारावीच्या झोपडपट्टीत गेले आणि शिक्षणही मुंबईत झाले.आई–वडील,पत्नी व दोन मुली असा त्यांचा छोटासा परिवार..आई–वडील घरेलू कामगार व कुक म्हणून काम करत असल्यामुळे घरची परिस्थिती हालाख्याची..या परिस्थितीमुळे आई–वडीलांना आपला हातभार लागावा याकरिता खाजगी क्षेत्रात ते नोकरी करू लागले,मे मधील शाळेच्या सुट्टीत मोटर पंप रिपेअर करणे,मल्टी टास्क अटेंडन्ट,ऑफिसबॉय अशी काम केली असून शाळेत असताना त्यांनी आरएसपी,स्काऊटगाईड मध्ये भाग घेतला,त्यातूनच त्यांना समाजसेवेची आणि देशसेवेची आवड निर्माण झाली.१२ वी पर्यंत शिक्षण झाल्यानंतर त्यांनी देशसेवा आणि समाजसेवा करता यावी याकरिता त्यांनी नागरी संरक्षण दल हि स्वयंसेवी संघटना जॉईंट केली.यामधून त्यांनी बऱ्याच आपत्ती जवळून पाहिल्या.त्यांनी ओरिसा येथील चक्रीवादळ,भुज येथील भूकंप,अंदमान–निकोबार सुनामी,मुंबईतील अतिवृष्टी,रेल्वेतील साखळी बॉम्बस्फोट कोल्हापूर जिल्ह्यातील पुरजन्य परिस्थिती,महाड–पोलादपूर–चिपळूण येथील जीवितहानी व पूरजन्य परिस्थिती या सर्व ठिकाणी त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत मदतकार्य व रेस्क्यू ऑपरेशन केलेले आहे,यावेळी या दुर्घटनेत मृतदेह काढताना त्यांचे हृदय पिळवटून निघत असे आणि आपसूकच डोळ्यात अश्रू उभे राहत असत,या परिस्थितीची सर्वसामान्यांना परिपूर्ण माहिती मिळावी या हेतूने त्यांनी जेवढया आपत्कालीन घटना घडल्या तेवढया आपत्तीची विविध वर्तमानपत्रातून येणारी कात्रणे गोळा करून त्यांच्या पुस्तिका तयार केलेल्या आहेत,या पुस्तिका पाहताना अक्षरशः आपल्या डोळ्यासमोर आपत्तीचे जिवंत चित्र उभे राहते,हा त्यांचा आगळावेगळा छंद काही औरच..! सुनिल होरंबे हे एक उत्तम खेळाडू असून त्यांनी २० वी अखिल भारतीय नागरी संरक्षण व्यावसायिक आणि क्रिडा स्पर्धा–२००० कुरुक्षेत्र–हरयाणा येथे प्रथम राष्ट्रीय सुवर्णपदक पटकावलेले आहे,तर ठाणे महा– मॅरेथॉन येथे त्यांनी ४२ किमी मध्ये ५ व्या क्रमांकाचे विजेतेपद पटकावलेले आहे,त्यांनी महत्वाचे पोलीस बंदोबस्त,तसेच रेल्वे पोलीस आयुक्त यांच्या विशेष भरारी पथकात काम करून कित्येक सराईत गुन्हेगारांना आणि संशयितांना पकडून दिले आहेत,याबाबत त्यांना मा.रेल्वे पोलीस महानिरीक्षक व रेल्वे पोलीस आयुक्त,मुंबई पोलीस दलातर्फे विविध प्रशंसापत्र मिळालेली आहेत. सध्या ते २६/११ रोजी मुंबईवर झालेल्या आतंकवादी हल्ल्यानंतर महाराष्ट्र सरकारने स्थापन केलेल्या आणि औद्योगिक तसेच अतिसंवेदनशील क्षेत्राची सुरक्षा करण्याकरिता स्थापन केलेल्या महाराष्ट्र सुरक्षा बलात विशेष पोलीस अधिकारी तथा प्रभारी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत,या ठिकाणीही त्यांनी आपला उत्तम कामगिरीचा ठसा उमटवत आपली कारकिर्द आणि समाजसेवेचे व्रत सुरू ठेवलेले असून त्यांची कामाच्या बाबतीत कडक स्वभावाचे व शिस्तबद्ध अधिकारी तर इतर वेळी मनमिळावू स्वभावाचे अधिकारी म्हणून ओळख आहे,ते आपल्या वर्दीला आपले सर्वस्व मानतात,आज या वर्दीमुळेच व महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळातील वरिष्ठ पोलीस अधिकारी,काही निवृत्त वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे मोलाचे सहकार्य मिळत असून आज मला गरीब जनतेची व देशसेवा करण्याची संधी मिळतेय हे मी माझे भाग्य समजतो असे ते सांगतात,त्यांनी स्वतःला देशसेवेसाठी झोकून दिले आहे.त्यांना अक्षता व मनश्री या दोन मुली असून त्याही आपल्या वडीलांच्या पावलावर पाऊल ठेवून देशसेवेसाठी लहान वयातच उस्फुर्तपणे कार्य करीत आहेत.

सुनिल होरंबे भारतीय पोलीस सेवेतील श्री मनोजकुमार शर्मा,श्री रविंद्र सिंहल,माजी पोलीस अधिकारी श्री जुलियो रिबेरो,श्री अरविंद ईनामदार,श्री राकेश मारिया,सध्याचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार श्री दत्ता पडसलीगर, एनआयएचे डॅशिंग पोलीस अधिकारी श्री सदानंद दाते,ठाण्याचे तात्कालीन पोलीस आयुक्त जयजीत सिंह,दिवंगत सिंधुताई सकपाळ यांना ते आपले आदर्श व गुरू मानतात. या महाराष्ट्र सुरक्षा बलात आतापर्यंत त्यांनी उत्तम कामगिरी केल्यामुळे या बलाचे पोलीस महासंचालक यांचेकडून त्यांना कित्येक प्रशंसापत्र मिळालेली आहेत. सुनिल होरंबे हे क्रिडा क्षेत्रात असल्यामुळे ते एक उत्तम गिर्यारोहक,दुर्गसंवर्धक, असून ते आजही सह्याद्रीचे अनेक ट्रेक आणि थरारक सुळक्यांचे आरोहण करत आहेत.एखादे चॅलेंजिंग काम करण्यासाठी ते सदैव तत्पर असतात,ते स्वतः एक प्राणीमित्र आणि सर्पमित्र असून त्यांनी विविध विषारी आणि बिनविषारी सापांची सुटका करून तसेच इतर विविध प्राण्यांची सुटका करून त्यांना जीवदान दिलेले आहे.ट्रेकिंग दरम्यान आदिवासी पाड्यात मित्रांच्या मदतीने स्वतः कपडे आणि खाऊचे वाटप करतात. चित्रकला,फोटोग्राफी,लेखन,कोकणातील पद्धतीचे जेवण बनविणे,वर्तमानपत्रातील महत्वाची कात्रण गोळा करणे,जुनी गाणी ऐकणे हे त्यांचे छंद...हे छंद ते आजही जोपासत आहेत. त्यांची हि कारकिर्द आणि समाजकार्य लाखमोलाचे आहे.त्यांच्या या कारकिर्दीमुळे त्यांना महाराष्ट्र सन्मान पुरस्कार, पोलीस आयकॉन पुरस्कार, अवयवदान सामाजिक बांधिलकी पुरस्कार, जयहिंद फाऊंडेशन कोरोनायोद्धा विशेष पुरस्कार, राष्ट्रीय स्नेहबंध शौर्य पुरस्कार, ठाणे सिटीझन गौरव पुरस्कार, ठउचचड व्होकेशनल पुरस्कार, पोलीस आयकॉन पुरस्कार, रत्नागिरी जिल्हा ग्रामस्थ मंडळांकडून विविध पुरस्कार मिळालेले आहेत. त्याचप्रमाणे सह्याद्री प्रतिष्ठान,मुंबई विभाग यांचेकडून शौर्या तुला वंदितो–२०२३ विशेष सन्मान करण्यात आलेला आहे. नियमित रक्तदान व आतापर्यंत १०२ वेळा रक्तदान केल्यामुळे नायर रुग्णालय,मुंबई व रक्त संक्रमण परिषद,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेद्वारे विशेष सन्मान करण्यात आलेला आहे.

त्यांनी रक्तदानासोबत मरणोत्तर अवयवदानदेखील केलेले आहे. कोरोना कालावधीत उल्लेखनीय असे कार्य केल्याबद्दल माजी गृहमंत्री अनिलजी देशमुख साहेब यांनी गेट वे ऑफ इंडिया येथे मुंबई २६/११ शहिद दिनाचेऔचित्य साधून इतर पोलीस अंमलदारांसोबत विशेष सत्कार केलेला आहे,तसेच त्यांनी १०२ वेळा रक्तदान केल्यामुळे माजी शिवसेना नेते व उद्योगमंत्री सुभाषजी देसाई साहेब यांनी विशेष सत्कार केलेला आहे. वरील सर्व उल्लेखनीय कामगिरीबाबत इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड–२०२३, राष्ट्रीय ओएमजी बुक ऑफ रेकॉर्ड–२०२३ व पुन्हा एकदा वर्ल्डवाईड बुक ऑफ रेकॉर्ड–२०२४ मध्ये नोंद होऊन सुवर्णपदके मिळालेली आहेत.

**********

**– रवींद्र मालुसरे**
**अध्यक्ष, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई**
**९३२३११७७०४**


# नारायण मूर्ती राहिले होते १२० तास उपाशी; पाच दिवस उपाशी राहिल्याने शरीरावर काय परिणाम होतात?

देशातल्या आयटी क्षेत्रातील दुसरी सर्वांत मोठी कंपनी इन्फोसिसचे संस्थापक एन. आर. नारायण मूर्ती हे त्यांच्या व्यावसायिक कौशल्यांबरोबर बेधडक विधानांमुळेही नेहमीच चर्चेत असतात. अलीकडेच त्यांनी संयुक्त राष्ट्राने आयोजित केलेल्या कार्यक्रमात उपाशी राहण्यासंदर्भात एक अनुभव शेअर केले. ५० वर्षांपूर्वी युरोपमध्ये हिचहायकिंग करताना ते जवळपास १२० तास उपाशी राहिले होते; ज्याचा अनुभव त्यांनी शेअर केला.म्हणून नारायण मूर्ती राहिले होते १२० तास उपाशी नारायण मूर्ती म्हणाले की, तुमच्यापैकी अनेकांना उपाशी राहण्याचा जितका अनुभव नसेल तितका मला आहे. ५० वर्षांपूर्वी जेव्हा मी युरोपातील बल्गेरिया (तेव्हा युगोस्लाव्हिया आणि आजचे सर्बिया)मधील सीमेवर असलेल्या निश नावाच्या ठिकाणी हिचहायकिंग करताना मी १२० तास उपाशी होतो. काही न खाता हा प्रवास सुरू होता.'अचिव्हमेंट्स इन फूड सिक्युरिटी : इंडियाज स्ट्राइड्स टू सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स' या विषयावरील संयुक्त राष्ट्रांच्या सत्राला संबोधित करताना त्यांनी हा अनुभव शेअर केला. पण, अशा प्रकारे एखादी व्यक्ती उपाशी राहिली, तर त्याचे तिच्या शरीरावर काय परिणाम होतात? याबाबत आपण डॉक्टरांचे मत जाणून घेऊ. 'द इंडियन एक्स्प्रेस'शी बोलताना उजाला सिग्नस ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सच्या आहारतज्ज्ञ डॉ. एकता सिंघवाल यांनी सांगितले की, पाच दिवसांपेक्षा जास्त किंवा १०० तासांपेक्षा जास्त काळ उपाशी राहिल्यास शरीरावर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.जर एखादी व्यक्ती केवळ पाणी पीत राहिली; पण अन्न खात नसेल, तर तिचे शरीर ऊर्जा मिळविण्यासाठी ऊतींचा वापर करण्यास सुरुवात करते. जेव्हा शरीरातून फॅटी ॲसिडचे प्रमाण घटते तेव्हा शरीर प्रोटीनवर काम सुरू ठेवते. पण, आठवडाभर उपाशी राहिलेल्या व्यक्तीचे शरीर शेवटी प्रोटीन मिळविण्यासाठी सक्रियपणे स्नायूंच्या उतींचे विघटन करण्यास सुरुवात करते, असे पुण्यातील बाणेरमधील मणिपाल हॉस्पिटलचे सल्लागार व गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी डॉ. प्रसाद भाटे म्हणाले.खूप दिवसांपासून उपाशी असलेल्या व्यक्तीचा मेंदू केटोन बॉडीज वापरण्यास सुरुवात करतो, हे केटोन, जे चरबीच्या विघटनाने तयार होतात. मेंदू केटोन्सवर कार्य करू शकतो; परंतु ते ग्लुकोजइतके कार्यक्षम नाही. पण, मेंदू दीर्घकाळ केटोनवर अवलंबून असेल, तर मेंदूचे स्नायू कमजोर होऊ शकतात,



असे दिल्लीतील पीतमपुरा येथील मधुबन डायट क्लिनिकचे आहार सल्लागार निमिषा जैन यांनी सांगितले.डॉ. जैन पुढे म्हणाले की, अशा परिस्थितीत चयापचय, वाढ व तणावाचे नियमन करणाऱ्या संप्रेरकांवर परिणाम होतो. उदाहरणार्थ, शरीर तणाव संप्रेरक कॉर्टिसॉलचे अधिक उत्पादन तयार करते; ज्यामुळे स्नायूंचे नुकसान होते आणि चरबीचा संचय होऊ लागतो. पण, खूप दिवस उपाशी राहिल्याने नैराश्य, चिंता, चिडचिडेपणा वाढण्यासह मूड बदलू शकतो. त्यामुळे मेंदूची कार्यपद्धती बिघडू शकते.त्यावर डॉ. सिंघवाल यांनी एखादी व्यक्ती उपाशी राहिल्यास तिच्या शरीरात काय परिणाम होतात हे समजून सांगितले आहे.खूप दिवस उपाशी राहिल्यास शरीरावर काय परिणाम होतात? १)पौष्टिक घटकांची कमतरता खूप दिवस उपाशी राहिल्यास शरीरास आवश्यक पौष्टिक घटकांची कमतरता निर्माण होते, जीवनसत्त्वे, खनिजे व प्रथिने, कर्बोदकांमध्ये व चरबी यांसारख्या मॅक्रोन्यूट्रिएंट्समध्ये कमतरता निर्माण होऊ शकते. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती कमजोर होऊ शकते. अवयवांचे कार्य बिघडू शकते आणि संपूर्ण शरीराची आरोग्य यंत्रणा विस्कळित होऊ शकते, असे डॉ. सिंघवाल म्हणाले.२) अशक्तपणा शरीरास पुरेसे अन्न न मिळाल्याने शरीर ऊर्जा मिळविण्यासाठी स्नायूंच्या ऊतींचे विघटन करण्यास सुरुवात करते. त्यामुळे स्नायू कमजोर होऊ लागतात. परिणामी अशक्तपणा, थकवा आणि शारीरिक कार्य करताना अडचणी येतात, असे डॉ. सिंघवाल म्हणाले.३) चयापचय क्रियेत बिघाड दीर्घकाळ उपाशी राहिल्याने शरीरातील चयापचय क्रियेत बिघाड होऊ शकतो; ज्यात शरीरात ऊर्जा वाचविण्यासाठी चयापचय क्रिया मंदावते. डॉ. सिंघवाल यांच्या म्हणण्यानुसार, उपाशी राहण्यामुळे वजन कमी होण्यासह आणि दीर्घकाळपर्यंत स्नायूंचे प्रमाण राखणे कठीण होऊ शकते. ४) इलेक्ट्रोलाइट असंतुलन खूप दिवस उपाशी राहिल्यास शरीरातील सोडियम, पोटॅशियम व मॅग्नेशियम यांसारख्या इलेक्ट्रोलाइट्सचे कार्य असंतुलित होते. सिंघवाल यांनी नमूद केले की, यामुळे चक्कर येणे, हृदयाचे अनियमित ठोके व स्नायूंमध्ये पेटके यांसारखी लक्षणे दिसू शकतात.५) अवयवांचे नुकसान दीर्घकाळ उपाशी राहिल्याने हृदय, यकृत व मूत्रपिंड यांसारख्या महत्त्वाच्या अवयवांवर ताण येतो. सिंघवाल म्हणाले की, कालांतराने यामुळे अवयवांचे नुकसान होऊ शकते आणि आरोग्याला त्रास होण्याचा धोका वाढू शकतो.६) मानसिक आणि भावनिक प्रभाव डॉ. सिंघवाल यांच्या मते, उपाशी राहिल्याने मानसिक आणि भावनिक आरोग्यावरही गंभीर परिणाम होऊ शकतो; ज्यामध्ये मूड बदलणे, चिडचिड, नैराश्य व लक्ष केंद्रित करण्यात अडचण येते.एकंदरीत, उपाशी राहिल्याने शरीरावर घातक परिणाम होऊ शकतात; जे टाळले पाहिजे. संतुलित आहार राखण्यासह दीर्घकाळ अन्नाची कमतरता जाणवत असल्यास वैद्यकीय मदत घेणे आवश्यक आहे, असे डॉ. सिंघवाल म्हणाले.

## मुले सतत अंगठा चोखतात? 'या' शब्दांच्या उच्चारणात निर्माण होऊ शकतो दोष




लहान मुलांमध्ये काही सवयी लहान वयात सामान्य विकासाचा भाग म्हणूनच दिसतात. ज्या तात्पुरत्या असून वेळेसोबत नाहीशा होतात. जर या सवयी सुरूच राहिल्या तर मुख व दातांचे आरोग्य बिघडू शकते. जसे अंगठा चोखण्याची सवय असल्यास र, त, द शब्दांचा उच्चार बिघडतील, अशी माहिती शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील बाल दंत रोगशास्त्र विभागातून पुढे आली.तीन वर्षांनंतरही बाळाचे अंगठा चोखणे सुरूच असेल तर त्याच्या दातांवर परिणाम होतो. दात पुढे येण्याचा मोठा धोका असतो. दुधाचे दात पडल्यावर पक्के दात येताना दातासह हनुवटीचा आकार बिघडण्याची शक्यता असते. लांना अशा चुकीच्या सवयी सोडविण्यासाठी पालकांनी प्रयत्न करावे, असे डॉ. रितेश कळसकर म्हणाले.मुलांच्या या सवयी घातक :अंगठा चोखणे दातांनी नाख तोडणे सतत ओठ चावणे तोंडाने श्वास घेणे विविध सवयीचे दुष्परिणाम : बोलताना जीभ बाहेर काढण्याचे प्रकार दिसतात. काही शब्द तोंडातल्या तोंडात बोलत असल्याचे दिसून येते. तोंडाच्या आसपासच्या ऊतींना मोठी हानी पोहोचते. जीभ दाबल्याने तोंड कोरडे होऊ शकते. श्वासाची दुर्गंधी होणे. दात किडणे आणि हिरड्यांचे आजार होणे. चुकीच्या तोंडी सवयीचा मुखावरच नाही, तर आरोग्यावरच नाही तर दिसण्यावर देखील परिणाम होतो. पुढे त्यांच्या मानसिकतेवर देखील गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. अश्या तोंडी सवईच्या उपचारासाठी पालकांच्या सहकार्याची व मुलांच्या योग्य समुपदेशनाची गरज असते.बऱ्याचदा या सवयी मागचे कारण हे मुलांमध्ये असलेली भीती किंवा तणाव असू शकते. यासाठी दंत वैद्यक यांच्याकडून उपचार घेणे गरजेचे आहे. विविध प्रकारच्या उपकरणांद्वारे जसे दातांना पिन लावणे, मुलांना मार्गदर्शन करणे अशा सहाय्यातून दंत वैद्यक निश्चितच या सवयी सोडवण्यासाठी मदत करत असतात.

## रणरणत्या उन्हात अल्ट्राव्हायोलेट किरणांपासून असा करा आपल्या त्वचेचा बचाव!

होळी, रंगपंचमीनंतर एप्रिलच्या पहिल्याच आठवड्यात उन्हाचा पारा आता चाळिशी ओलांडण्याच्या तयारीत आहे. तापमानात झालेल्या अचानक वृद्धीमुळे उन्हात बाहेर पडणाऱ्यांची मात्र चांगलीच दमछाक होते. उन्हात जाणे टाळता येत नाही, पण बचाव जरूर करता येतो. म्हणूनच मुलींचा फॅशन मोर्चा आता सनकोट, हॅण्डग्लोज, रेडिमेड स्टोल खरेदीकडे वळला आहे. उन्हाची तीव्रता अनुभवल्यावर सनकोटला नाक मुरडणाऱ्या मुलींनी सनकोट वापरायला सुरवात केली आहे. सूर्याच्या अतिनील किरणांमुळे म्हणजे अल्ट्राव्हायोलेट किरणांमुळे त्वचेचे सर्वाधिक नुकसान उन्हाळ्यात होते. त्वचेतील मेलॅनिन नावाचे द्रव्य (ज्या द्रव्यांमुळे त्वचा विशिष्ट वर्णाची दिसते) असल्यामुळे गोऱ्या वर्णाच्या व्यक्तींना उन्हाचा त्रास अधिक जाणवतो. उन्हात गेल्यावर त्वचेत अधिक प्रमाणात मेलॅनिन आपोआप तयार होते.त्यासाठी सनस्क्रीन लोशन बरोबर सुती कपड्यांचा आधार घ्यावा लागतो. ओझोनचा थर दिवसेंदिवस कमी होत असल्यामुळे तीव्र उन्हाचा सामना करताना सनबर्नचा धोका वाढतो. नोकरदार महिला, महाविद्यालयीन तरुणींना दुचाकी चालवताना उन्हासोबत प्रदूषणाचा सामना करावा लागतो. सिग्नलवर, ट्राफिकमध्ये अधिक वेळ थांबल्यावर कोणताही ड्रेस, साडी परिधान केला असला तरी हात, मान पूर्णपणे झाकली जात नाही. त्यातून त्वचा कोरडी होऊन काळपटपणा येतो शिवाय त्वचेची आग होते. अशा परिस्थितीत बाहेर जाणे टाळता येत नाही पण, हॅण्डग्लोज, स्टोल, सनकोटसारखे पर्याय उन्हापासून



संरक्षण करतात. कारण उन्हाचा थेट परिणाम कपड्यांवर होतो.साधारण स्टोल घेतल्यानंतर एकसारखा करून तो बांधावा लागतो पण, रेडिमेड वेलक्रो टचमुळे स्टोल बांधण्याची गरज पडत नाही तर केवळ अडकवावे लागतात. त्याचबरोबर हॅण्डग्लोजमध्ये दोन साइज मिळतात त्यात हात आणि बोटांच्या आकारानुसार निवड करता येते. त्यामध्ये केवळ पांढरा आणि स्कीन असे दोनच रंग मिळतात.तसेच साधे सनकोट ट्रेंडी दिसण्यासाठी स्कीन फ्रेंडली मटेरिअल वापरले जाते. ठिपक्यांची, हार्टशेप, फुलांच्या नक्षीच्या सनकोटची सध्या चलती आहे. सनकोटच्या नक्षीत वैविध्य असले तरी पांढऱ्या रंगाला पसंती दिली जाते. सध्यातरी सनकोटवर पांढऱ्या रंगाचे वर्चस्व आहे.दुचाकी चालवताना स्टोल, हॅण्डग्लोज, सनकोट सर्वच गोष्टी आवश्यक असतात. त्यामुळे या तिन्ही वस्तूंना मागणी आहे. सनकोटमध्ये कॉटन, चिकन, केमरिक कॉटन त्यामध्ये प्रिंटेड, प्लेन असे सनकोट उपलब्ध आहेत. पाच बटणांचे, दोन खिशांचे, समोरून बटणाऐवजी झिप, बाह्यांना फ्रील आणि पाठीमागे कॅप असलेले सनकोटचे नवनवीन प्रकार आले आहेत. जे साधारणतः २०० ते ५०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत.

## ३ पैकी २ ग्राहकांचा रोगप्रतिकारकशक्ती वाढवण्यासाठी व्हिटॅमिन सी सप्लीमेंटवर विश्वास, सर्वेक्षणातून समोर आली माहिती



कोरोना महामारीनंतर जगभरातील व्यक्ती आरोग्याबाबत अधिक जागरूक झाल्या आहेत. आरोग्याची काळजी घेण्यासाठी जीवनशैलीमध्ये बदल करण्याला अधिक प्राधान्य देताना दिसत आहेत. अनेक व्यक्तींच्या आरोग्याशी संबंधित गरजांना उत्तम प्रकारे जाणून आणि समजून घेण्यासाठी ॲबॉट या जागतिक हेल्थकेअर कंपनीने आयपीएसओएससोबत सहयोगाने एक सर्वेक्षण केले आहे. या सर्वेक्षणाचे नाव आहे 'हेल्दी लिव्हिंग : द रोल ऑफ व्हिटॅमिन सी'. या सर्वेक्षणातून समोर आलेल्या काही गोष्टी त्यांनी सादर केल्या आहेत. कंपनीने केलेल्या या सर्वेक्षणामधून असे निर्देशनास आले आहे की, १० पैकी जवळपास ७ व्यक्तींचे आरोग्य आणि रोगप्रतिकारकशक्ती उत्तम असण्यासोबतच ऊर्जा पातळी देखील चांगली आहे.या व्यक्ती कोणत्याही वेदनेशिवाय नियमितपणे व्यायाम करतात. यातील बहुतांश व्यक्ती या उत्तम आरोग्यासाठी व्हिटॅमिन सी ची पातळी शरीरात योग्य प्रमाणात राखण्याचा प्रयत्न देखील करतात. व्हिटॅमिन सी सप्लीमेंट्सचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत.या संदर्भात बोलताना ॲबॉट इंडियाच्या मेडिकल अफेअर्सचे असोसिएट डायरेक्टर डॉ. कार्तिक पितांबरन म्हणाले की, ''व्हिटॅमिन सी मुळे व्यक्तीची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत होते. व्हिटॅमिन सी युक्त सप्लीमेंशन श्वसनविषयक आजारांना प्रतिबंध आणि उपचार करण्यासाठी ओळखले जाते आणि त्याचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. आमच्या सर्वेक्षणामधून एकूण आरोग्य उत्तम राखण्यामध्ये व्हिटॅमिन सीची भूमिका निदर्शनास येते.''''व्हिटॅमिन सीचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. जसे शरीराची रोगप्रतिकारकशक्ती आणि हाडे मजबूत करण्याचे काम व्हिटॅमीन सी करते. व्हिटॅमीन सी मुळे जखम लवकर बरी होण्यास मदत होते, हिरड्या आरोग्यदायी राहतात. म्हणून, व्हिटॅमिन सीच्या कमतरतेमुळे अपूर्ण पोषण मिळते,'' असे मुंबईतील सुचक हॉस्पिटलचे कन्सल्टिंग फिजिशियन आणि कार्डिओलॉजिस्ट डॉ. केतन मेहता म्हणाले.मेहता पुढे म्हणाले की, ''व्हिटॅमिन सीचे सतत सेवन केल्यामुळे रोगप्रतिकारशक्ती मजबूत होण्यासह मधुमेह सारख्या असंसर्गजन्य आजारांनी पीडित व्यक्तींना फायदा देखील होतो, ज्यांना कदाचित उच्च प्रमाणात व्हिटॅमिन सी ची गरज भासू शकते.'' आयपीएसओएसने मुंबई, दिल्ली, कोलकाता, चेन्नई, हैदराबाद, बेंगळुरू, कोची, अहमदाबाद आणि पुणे या ९ शहरांमधील २,००० हून अधिक व्यक्तींचे सर्वेक्षण केले.या सर्वेक्षणातून काही प्रमुख बाबी समोर आल्या. त्या खालीलप्रमाणे :५२ टक्के व्यक्ती म्हणाल्या की, पावसाळा आणि हिवाळ्यादरम्यान व्हिटॅमिन सी सप्लीमेंट्सचे सेवन केल्यामुळे आजारी पडण्याचे प्रमाण कमी झाले.६१ टक्के महिलांना व्हिटॅमिन सी आजारामधून लवकर बरे करण्यामध्ये गुणकारी असल्याचे आढळून आले.जवळपास ६० टक्के (५० टक्के नॉन–सप्लीमेंट युजर्ससह) व्यक्तींनी सांगितले की, व्हिटॅमिन सीमुळे आजारामधून लवकर बरे होण्यास मदत झाली.

६५ टक्के व्यक्तींना असे वाटते की, व्हिटॅमिन सप्लीमेंट्स एकूण आरोग्य उत्तम राखण्यामध्ये मदत करतात आणि व्हिटॅमिन सी हाडांचे आणि सांध्यांचे आरोग्य उत्तम राखण्यास मदत करू शकते, असे ५२% व्यक्तींना वाटते.७३% व्यक्ती या पुरेशा प्रमाणात पाणी पितात आणि आजारामधून लवकर बरे होण्यासाठी संतुलित आहाराचे सेवन करतात. व्हिटॅमिन सी च्या कमी सेवनाचे परिणाम खालीलप्रमाणे :व्हिटॅमिन सीच्या कमतरतेमुळे रोगप्रतिकारशक्ती कमी होते, असे ६०% लोकांना वाटते.व्हिटॅमिन सी च्या कमतरतेमुळे आजारामधून बरे होण्यास विलंब होतो, असे ३६ टक्के लोकांना वाटते.डॉ. केतन मेहता पुढे म्हणाले की, '' व्हिटॅमिन सी आणि रोगप्रतिकारकशक्ती वाढवण्यामध्ये आणि संसर्गांशी लढण्यामध्ये साह्य करण्यामध्ये त्यांच्या भूमिकेवरील संशोधन अभ्यासांशी सुसंगत आहेत. दैनंदिन आहारामध्ये व्हिटॅमिन सीचा समावेश केल्याने व्यक्तींना रोगप्रतिकारकशक्ती प्रबळ राखत आरोग्यदायी राहण्यास मदत होऊ शकते.''

## आतड्यांच्या कॅन्सरचा वाढतोय धोका, जाणून घ्या लक्षणे

कॅन्सरचे अनेक प्रकार आपल्याला माहीत आहेत. जगभरात कॅन्सरची समस्या हळूहळू वाढताना दिसत आहे. यामध्ये कोलन कॅन्सरचा धोका अधिक आहे. याला कोलोरेक्टल कॅन्सर म्हणूनही ओळखले जाते. मोठ्या आतड्यांचा कॅन्सर हा मोठे आतडे हा गुदाशयात उद्भवतो.हे पॉलीप म्हणून दिसून येते, कोलन किंवा गुदाशयाच्या आतील अस्तरावरील पेशींचा एक छोटा समूह कालांतराने कर्करोगात विकसित होऊ लागतो. मोठ्या आतड्याचा कर्करोग हा कोलोनोस्कोपीसारख्या नियमित तपासणीद्वारे टाळता येतो.आहारात हिरव्या भाज्यांच्या सेवनाची कमतरता, विशेषत: स्मोक्ड किंवा जळलेल्या लाल मांसाचा जास्त वापर, शारीरिक हालचालींचा अभाव, लठ्ठपणा, धूम्रपान आणि मद्यपान यांसारखे जीवनशैली घटक मोठ्या आतड्यांच्या कर्करोगास कारणीभूत ठरतात. या प्रकारच्या कर्करोगाच्या विकासामध्ये वय महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, ५० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींना जास्त धोका असतो.आतड्याच्या जैविक असंतुलनामुळे दीर्घकाळ जळजळ होऊ शकते आणि आतड्यांसंबंधी अस्तरांना नुकसान



होऊ शकते, ज्यामुळे मोठ्या आतड्याच्या कर्करोगाची संभाव्यता वाढते. संशोधनानुसार, वायू प्रदूषण आणि काही रसायनांच्या संपर्कात येण्यासारखे पर्यावरणीय घटकही मोठे आतडे आणि गुदाशयामध्ये कर्करोगाच्या वाढीस चालना देण्यासाठी भूमिका बजावू शकतात. ही वैविध्यपूर्ण कारणे समजून घेतल्याने मोठ्या आतड्यांच्या कर्करोगासाठी प्रतिबंधक धोरणे आणि वेळीच निदानास मदत होऊ शकते.मोठ्या आतड्याचा कॅन्सर हा सायलेंट किलर आहे, ज्याच्या सुरवातीच्या टप्प्यात कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. हा रोग जसजसा वाढतो, तसतसे काही लक्षणे दिसू शकतात.आतड्यांच्या सवयींमध्ये सतत होणारे बदल, की अतिसार किंवा बद्धकोष्ठता; तसेच शौचावाटे रक्त येणे किंवा गुदाशयातील रक्तस्त्राव याचा अर्थ मोठ्या आतड्याचा कर्करोग होऊ शकतो.अचानक वजन कमी होणे आणि सतत थकवा हीदेखील सामान्य लक्षणे आहेत, ज्याकडे दुर्लक्ष केले जाऊ नये.मोठ्या आतड्याचा कॅन्सर असलेल्यांना ओटीपोटात वेदना किंवा अस्वस्थता, पोट फुगणे आणि शौचास जाऊन आल्यानंतरही पूर्णतः मलविसर्जन न झाल्याची तक्रार जाणवते.

मलविसर्जनातील बदलाकडे त्वरित लक्ष देणे आवश्यक आहे. कारण हे मोठ्या आतड्याच्या कर्करोगाचे लक्षण असू शकते.या चेतावणी चिन्हांकडे लक्ष देणे आणि ते दीर्घकाळ टिकून राहिल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. कोलोरेक्टल कॅन्सर असलेल्या रुग्णांचे परिणाम सुधारण्यासाठी वेळीच तपासणी आणि उपचार महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.उपचार महत्त्वाचे शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडिएशन थेरपी आणि टार्गेटेड थेरपी यांचा समावेश आहे. तुमचे डॉक्टर तुमच्यासाठी योग्य उपचार पद्धती ठरवतील. नियमित कोलोनोस्कोपी किंवा इतर शिफारस केलेल्या तपासणी केल्याने त्यांचे आरोग्य प्रभावीपणे व्यवस्थापित करण्यात आणि कोलोरेक्टल कर्करोग त्याच्या सुरवातीच्या टप्प्यात शोधण्यात मदत होऊ शकते.मृत्यूदर कमी करण्यासाठी आणि या प्राणघातक कर्करोगाने प्रभावित झालेल्या व्यक्तींकडे पाहण्याचा दृष्टिकोन वाढविण्यासाठी हे सक्रिय धोरण महत्त्वाचे आहे.

# लातूर लोकसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टीद्वारे सुधाकर शृंगारे यांच्या निलंगा मतदार संघात गाठीभेटी संपन्न.

लातूर– भारतीय जनता पार्टीच्या प्रचाराचे संयोजक, माजी मंत्री आणि आमदार श्री. संभाजीराव पाटील निलंगेकर द्वारे आयोजित महा विजय २०२४ अभियानांतर्गत मतदारांच्या निलंगा विधानसभा मतदारसंघात गाठीभेटी घेण्यात येत आहेत निलंगा विधानसभा मतदार संघातील अनेक प्रतिष्ठित नेते, व्यापारी, डॉक्टर्स, शैक्षणिक संस्था, शुभ मंगल कार्य अशा भेटी देऊन नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून महायुती सरकार विकसित भारत ही संकल्पना राबविण्यात यशस्वी झाली असून पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करून देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान करण्यासाठी आपली साथ आवश्यक आहे असे आवाहन श्री. सुधाकरराव श्रृंगारे यांनी केले. माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या समवेत निलंगा शहरात छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास वंदन करून कार्यकर्ता दौऱ्याचा शुभारंभ केला. तदनंतर शहरात आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या निवासस्थानी स्नेह भेट. पीर पाशा दर्गा येथे चादर अर्पण, निळकंठेश्वर मंदिर व विठ्ठल रुक्माई मंदिर येथे मनोभावे दर्शन, यांच्या निवासस्थानी स्नेह भेट देऊन परिसरातील नागरिकांशी मुक्त संवाद साधला .निलंगा शहरातील भगवान गौतम बुद्ध, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, माजी मुख्यमंत्री कर्मयोगी डॉक्टर शिवाजीराव पाटील निलंगेकर यांना नमन, सुप्रसिद्ध व्यापारी प्रल्हाद बाहेती निवासस्थान, मुशिर कादरी यांचे हॉटेल, चाऊस यांच्या हॉटेल व निवासस्थान, ज्येष्ठ मान्यवर श्री. निळकंठ पेटकर, श्री. वीरभद्र स्वामी, निलंगा नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे यांच्या निवासस्थान आदी ठीकाणी वंदन आणि स्नेह भेटी केल्या.



पुढील प्रवासादरम्यान गुरनाळ गावच्या ग्रामस्थांची स्नेहभेट घेऊन सत्कार स्वीकारला. तसेच अनंत गोमसाळे यांचे सुपुत्र चि .अमोल व चि. सौ. का. राजश्री यांच्या शुभविवाहास उपस्थित राहून नमदाम्पत्यास भावी सुखी वैवाहिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

वलांडी शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन केले. शहरातील बालाजी मंदिर येथे मनोभावे दर्शन घेऊन नागरिकांच्या उन्नतीसाठी यावेळी प्रार्थना करण्यात आली हुडगे यांच्या कापड दुकान प्रतिष्ठानला स्नेह भेट देऊन जनतेशी संवाद साधला.

देवणी येथील श्री सद्गुरु शेषनाथ महाराज देवस्थानात पूजा करून विवेकवर्धिनी माध्यमिक विद्यालय, देवणी नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष वैजनाथ आष्टुरे यांच्या निवासस्थानी सस्नेह भेट दिली.

यावेळी भाजपा प्रदेश चिटणीस आणि लातूर जिल्हा प्रभारी श्री. किरणजी पाटील, भाजपा जिल्हा सरचिटणीस श्री. संजय दोरवे, भाजपा जिल्हा सरचिटणीस श्री. भारत चामे, भाजपा युवा मोर्चा ग्रामीण जिल्हाध्यक्ष श्री. अमोल निडवदे, शिवसेना जिल्हाप्रमुख (शिंदे गट) श्री. शिवाजीराव माने, उपजिल्हाप्रमुख श्री. विनोद आर्य, जिल्हा उपाध्यक्ष श्री. शेषराव मोरे, भाजपा तालुका अध्यक्ष श्री. कुमुद लोभे ,माजी नगराध्यक्ष श्री. वीरेंद्र स्वामी, निलंगा विधानसभा निवडणूक प्रमुख श्री. दगडू साळुंखे, शहर भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष श्री. तम्मा माडीबोने, रिपाई जिल्हा उपाध्यक्ष श्री. अंकुश ढरे, शिवसेना तालुकाप्रमुख तानाजी सूर्यवंशी, मुस्ताक शेख, सुधीर पाटील, संजय हलगरकर ,रवी कांबळे, दत्ता मोहोळकर, काशिनाथ गरिबे, तालुकाध्यक्ष रामलिंगेश्वर शेरे, माजी जि.प. अध्यक्ष श्री. पंडितराव धुमाळ, श्री. दीपक मगे, श्री. मुस्ताक शेख, श्री. सुधीर पाटील, श्री. दत्ता मोहोळकर, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया जिल्हा उपाध्यक्ष श्री. अंकुश ढरे, श्री. मनोहर पटणे, श्री. शंकर पाटील तळेगावकर, श्री. मनोहर पाटील, श्री. दिलीप मगे, श्री. संदीप पेठे, श्री. अनिल मस्के, प्राचार्य डी. वी.राजे याचेसह कार्यकर्ते ,पदाधिकारी ,शिवसैनिक, नव मतदार व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# औसा तालुक्यात गाळ मुक्त धरण, गाव युक्त शिवार योजना प्रभावीपणे राबवा - लातूर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे ..

औसा / प्रतिनिधी : – औसा तालुक्यात गाळ मुक्त धरण, गाव युक्त शिवार योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी लातूर जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितत औसा तालुक्यातील मौजे मातोळा, लोहटा, माकणी, आशिव गावाची पाहणी करण्यात आली असून यावेळी लातूरचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर –घुगे मॅडम यांच्यासह उपविभागीय अधिकारी औसा – रेणापूरचे अविनाश कोरडे, औशाचे तहसीलदार भरत सुर्यवंशी, जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता अमर पाटील, जिल्ह्याचे जलसंधारण अधिकारी अ शि. कांबळे उपस्थित होते. या विषयी वृत्त की, दि. ०३ एप्रिल २०२४ बुधवार रोजी सायंकाळी ०४ : ०० वाजता अचानक प्रकल्पाच्या क्षेत्रीय कामाची पाहणी करण्यात आली. या सोबत लातूर जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत्र, पाणी टंचाई परिस्थिती बाबत तपासणी, आरक्षित पाणीसाठा प्रतिबंधात्मक उपाययोजना, सद्यस्थितीतील पाणीसाठा उपलब्धता, त्यावर अवलंबून गाव, तालुके, तांडा वस्ती इत्यादी बाबत सखोल विचारणा करण्यात आली. औसा तालुक्यातील विविध गावांमध्ये 'गाळ मुक्त धरण, गाव युक्त शिवार' योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सुचना व मार्गदर्शन करण्यात आले, औसा तालुक्यात सध्याच्या पस्थितीतील पाणी टंचाई व उपाय योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी तसेच पाण्याचा जलस्रोत वाढविण्यासाठी, पाणी साठा वाढविणे व जमीन सुपीक होणे व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे यावर उपाय योजना म्हणून लातूर जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितत औसा तालुक्यातील विविध गावांमध्ये भेटी दिल्या. यावेळी क्षेत्रिय सर्व अभियंता व कर्मचारी यांचा सोबत काम करत महसूल, गाव पातळी वरील सर्व कर्मचारी आणि अधिकारी यांचा सहभाग बाबतीत प्रकल्पा स्थळी सूचना व आदेश दिले, सोबत सेवाभावी संस्थांच्या कामाची पाहणी केली आणि सर्व ग्रामस्थ, शेतकरी, लाभधारक यांच्या सोबत संवाद साधत सहभाग नोंदविण्याबाबत चर्चा करून 'गाळ मुक्त धरण, गाळ युक्त शिवार योजना प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना करण्यात आल्या, यावेळी जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता अमर पाटील, जलसंपदा विभागाचे उपविभागीय अधिकारी अभियंता नितीन बी. पाटील यांच्या सह सर्व क्षेत्रीय अभियंते, महसूल गाव पातळीवरील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# भाजपने शिंदे, पवारांना ताटाखालचे मांजर बनविले: अंबादास दानवे

छत्रपती संभाजीनगर, : भारतीय जनता पक्षाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना ताटाखालचे मांजर बनविले आहे. दोघांनाही भाजपच्या लेखी कवडीची किंमत ठेवलेली नाही. भाजप म्हणेल, तेच त्यांना करावे लागत आहे, अशा शब्दांत शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे नेते आणि विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यावर टीकास्त्र सोडले.दानवे यांनी गुरुवारी (दि.४) छत्रपती संभाजीनगरात पत्रकारांशी संवाद साधला. राज्यात लोकसभा निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाला त्यांचे काही उमेदवार बदलावे लागले. त्याबाबत विचारले असता दानवे म्हणाले, एकनाथ शिंदे असोत किंवा अजित पवार असो या दोघांची अवस्था सध्या वाईट झाली आहे. त्यांना भाजप म्हणेल तेच करावे लागत आहे. भाजपच्या सांगण्यावरुन त्यांना उमेदवार बदलावे लागत आहेत. याआधीही शिवसेना भाजपची युती होती. पण तेव्हा शिवसेनेचा उमेदवार कोण असावा, हे सांगण्याची भाजपची कधी हिंमत झाली नाही. कारण उमेदवार हा तो पक्ष ठरवत असतो. मित्र पक्षाला त्यात ढवळाढवळ करण्याचा अधिकार नसतो. पण इथे भाजपने शिंदे, पवारांना ताटाखालचे मांजर बनविले आहे, असे दानवे म्हणाले. सध्या महायुतीची अवस्था वाईट झाली आहे. त्यांना राज्यात कुठेही कुवतीचे उमेदवार मिळत नाहीत, असा आरोपही दानवे यांनी केला. छत्रपती संभाजीनगरात शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाने आपला उमेदवार आधीच जाहीर केला आहे.

# किनवट पोलिस स्टेशन येथे शांतता कमिटीची बैठक संपन्न

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव, ईद उत्सव, राम नवमी उत्सव, हनुमान जयंती आणि लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीच्या धर्तीवर पोलीस स्टेशन किनवटचे पोलीस निरीक्षक बिर्ला यांनी दिनांक ३ एप्रिल रोजी शांतता कमिटीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यासमयी पवार स्वामी, विनोद भरणे, प्रमोद पहूरकर, विवेक ओंकार, गणेश शर्मा, हबीब भाई इत्यादींनी आपले म्हणणे मांडले. या संपन्न झालेल्या शांतता कमिटीच्या बैठकीत शहरातील पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, नेते, तसेच उत्सव समितीचे पदाधिकारी यांनी उपस्थित लावली होती. सदर बैठकीत शहरातील सर्व मुख्य रस्त्यावर मोकाट गाढवे, खेचर, जनावरे, कुत्रे, वराह प्राण्यांचा २४ तास वावर असतो. त्या संदर्भात अनेकदा वर्तमानपत्रातून बातम्याही प्रसिद्ध झाल्या परंतु त्याची दखल घेतली



गेली नाही. परत सदर मोकाट जनावरांचा नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतोय अशी खंतही बैठकी दरम्यान व्यक्त करण्यात आली. वाहन धारकांना वाहन चालवणे जिकरीचे झाले आहे. याबद्दल आता पोलिसांनीच पुढाकार घेऊन गंभीरतना बंदोबस्त करून जनतेला दिलासा द्यावा. अशी एकमुखी मागणी करण्यात आली. किनवट शहर हे जातीय तेड विरहित असे शहर असून येथे आजपर्यंत जातीय दंगली कधीच उदभवल्या नाहीत. हिंदू मुस्लिम सहित सर्व धर्मातील लोक गुण्यागोविंदाने नांदतात. तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक, ते बसस्टँड रोड रस्त्यावरील उत्सव मिरवणुकीच्या वेळी डीजेचा आवाज मर्यादित ठेवून आम्हास सहकार्य करावे असे पोलीस निरीक्षक बिर्ला साहेब यांनी सहकार्याची अपेक्षा केली. यावेळी पत्रकार किशन भोयर, अनिल भंडारे, प्रमोद पोहरकर, फुलाजी गरड, दत्ता जायभाये, दिलीप पाटील, शेख शौकत, मोईस खान, विवेक ओंकार, विनोद भरणे, किरण ठाकरे, गणेश शर्मा सहित इतरांनी धार्मिक उत्सवा संबंधित आपले मत मांडले. दरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक सहित सर्व कर्मचारी सामाजिक नेते, कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

# बीजेपी'चे राज्यभर बूथ विजय अभियान, लोकसभा निवडणुकीची जोरदार तयारी

धुळे : लोकसभा निवडणुकीच्या तयारीचा एक भाग म्हणून भारतीय जनता पार्टीतर्फे राज्यभर तीन एप्रिलपासून सहादिवसीय 'बूथ विजय अभियान राबविण्यात येत आहे, अशी माहिती भारतीय जनता पक्षाचे प्रदेश प्रवक्ते प्रदीप पेशकार यांनी दिली. सहादिवसीय बूथ विजय अभियानांतर्गत आज येथे पत्रकार परिषद झाली. यावेळी व्यासपीठावर भारतीय जनता पक्षाचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, प्रदेश प्रवक्ते संजय शर्मा, प्रदेश प्रवक्ते गोविंद बोरसे, भाजपचे जिल्हा महामंत्री यशवंत येवलेकर, जिल्हा प्रवक्ता श्यामसुंदर पाटील, भाजयुमोचे महानगर जिल्हाध्यक्ष आकाश परदेशी आदी उपस्थित होते.पेशकार म्हणाले, की लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने ४०० पारचा नारा दिला आहे. तसेच प्रत्येक लोकसभा मतदारसंघातील भाजपच्या उमेदवारांना प्रत्येक बूथवर गेल्या वेळच्या निवडणुकीपेक्षा ३७० मते वाढविण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. महायुतीच्या उमेदवाराच्या विजयाचे मताधिक्य वाढविण्याचे प्रयत्न केले जाणार असल्याचे प्रदीप पेशकार यांनी सांगितले.बूथ विजय अभियाना अंतर्गत समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचण्याचे लक्ष्य असून प्रत्येक बूथवर या ६ दिवसांत विविध उपक्रम हाती घेण्यात येत आहेत, अशी माहिती प्रदीप पेशकार यांनी दिली. घरोघरी पत्रके पोहोचवून मतदारांशी थेट संपर्क साधणे, प्रत्येक घर व वाहनावर स्टिकर्स लावणे, लाभार्थ्यांशी नियमित संपर्कात राहणे, प्रत्येक कार्यकर्त्याच्या घरी भाजपाचा झेंडा लावणे आदी उपक्रम राबवले जातील.

युवा वर्ग, महिला असे समाजातील विविध घटकांसाठी ५ समूह

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात सेल्फी पॉइंटचे उद्घाटन

लातूर दि. ०४ एप्रिल सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, ४१–लातूर लोकसभा मतदारसंघ (अ.जा.) तथा उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, लातूर यांच्या मार्गदर्शनानुसार २३५–लातूर शहर मतदार संघ स्वीप अंतर्गत महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात मतदार जागृती रॅली काढणे, विविध स्पर्धा आयोजन करणे, असंघटित कामगारांचे पथनाट्यद्वारे प्रबोधन करणे, रंग लोकशाहीचा अंतर्गत मतदार जागृती टयटू, टोप्या तयार करणे, मतदार जागृतीसाठी ग्रिटींग बनविणे, चित्रकला स्पर्धा, रागोळी स्पर्धा आणि रंग भरण स्पर्धा, भारत भाग्य विधाता गट स्थापन करणे, स्वाक्षरी मोहीम, दिव्यांग मतदारांना संकल्प पत्र देणे आणि चुनावी पाठशाला अशा दहा कलमी कार्यक्रमांतर्गत महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात सेल्फी पॉइंटचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य



प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, डॉ. बाळासाहेब गोडबोले, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, डॉ. अभय धाराशिवे आणि एन.सी.सी.कॅडेट्स यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डॉ. संजय गवई म्हणाले की, आपल्या लातूर लोकसभा मतदारसंघांमध्ये ०७ मे २०२४ रोजी मतदान होत आहे तेव्हा मतदान प्रक्रियेमध्ये सक्रिय सहभागी करून घेण्यासाठी सर्वाना प्रोत्साहित करावे असेही ते म्हणाले. यावेळी सर्वानी सेल्फी काढले.

# सर्वांच्या सहकार्याने यशवंत नागरी सह. बँकेची नेत्रदीपक प्रगती : सुहास पाचपुते

लातूर : मावळत्या आर्थिक वर्षात संचालक मंडळ , ठेवीदार, भागधारक, खातेधारक आणि अधिकारी – कर्मचारी या सर्वांच्या सहकार्याने यशवंत नागरी सहकारी बँकेने नेत्रदीपक प्रगती केल्याची माहिती बँकेचे चेअरमन सुहास पाचपुते यांनी गुरुवारी बोलताना दिली. दि. ३१ मार्च २०२४ या आर्थिक वर्ष अखेर बँकेने साधलेल्या प्रगतीची माहिती देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत सुहास पाचपुते म्हणाले की, आपण बँकेच्या चेअरमन पदाची जबाबदारी स्विकारल्यापासून बँकेच्या ठेवीत लक्षणीय वाढ झाली आहे. बँकेच्या ठेवी ३१ कोटी असताना आपण या पदावर विराजमान झालो. त्यानंतर वर्षात या ठेवी ५३ कोटींपर्यंत पोहचल्या. ठेवीत ७० टक्के एवढी भरीव वाढ होऊ शकली. मागच्या आर्थिक वर्षात भागभांडवल १६. ३१ कोटी होते, आज ते ३७०२७ कोटींवर जाऊन पोहचले आहे. म्हणजे भागभांडवलात एका आर्थिक वर्षात आम्हा सर्वांच्या प्रयत्नाने दुपटींहून अधिक वाढ झाली आहे. कर्जवाटपही मागच्या वर्षाच्या तुलनेत



दुपटीने करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मावळत्या वर्षात आपल्या बँकेचा एनपीए दर शून्य टक्के राहिला. सीडी चे प्रमाण ५१. टक्क्यांहून ७०. टक्क्यांपर्यंत पोहचले. मागच्या वर्षी बँकेला ३६. ७२ लाखांचा नफा झाला होता, यावर्षी हा नफा ७७. लाखांवर पोहचल्याचे पाचपुते यांनी सांगितले. सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, आ. अभिमन्यू पवार यांचे आपल्याला वेळोवेळी उपयुक्त असे मार्गदर्शन लाभते. या मार्गदर्शनाच्या बळावरच बँकेची ही नेत्रदीपक प्रगती होत असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मागच्या आर्थिक वर्षात बँकेने आपल्या दोन नवीन शाखा सुरु केल्या असून स्वतंत्र मुख्यालय कार्यरत केले आहे. आर्थिक वर्षात दोन नवीन शाखा सुरु करण्याचा संचालक मंडळाचा मानस असल्याचेही सुहास पाचपुते यांनी नमूद केले. मागील आर्थिक वर्षात बँकेने ग्राहकांना अद्यावत बँकिंग सुविधा आहे. बँकेच्या ग्राहकांना एटीएम, युपीआय, क्यूआर कोडाची सुविधा उपलब्ध करून देण्यास्तही आपण प्रयत्नशील आहोत. बँकेच्या चेअरमन पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर आपण बँकेच्या सर्व अधिकारी – कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन काम करत असल्याचेही पाचपुते यांनी सांगितले. भविष्यात महिला बचत गट आणि व्यावसायिकांना कमीत कमी व्याज दारात कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्याचा आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले. यावेळी बँकेचे व्हा. चेअरमन सूर्यभान पाटील, व्यवस्थापक एस.आर. कापसे यांची उपस्थिती होती.

# राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून दुसरी यादी जाहीर; बीड, भिवंडीमधून 'यांना' उतरवले रिंगणात

लोकसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून बहुप्रतीक्षित उमेदवारांची दुसरी यादी आज (दि.३ एप्रिल) जाहीर झाली. भिवंडीमधून सुरेश उर्फ बाळ्यामामा म्हात्रे आणि बीडमधून बजरंग सोनवणे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या पक्षानं ३० मार्च रोजी आपली पहिली यादी जाहीर केली होती. यामध्ये सुप्रिया सुळे (बारामती), डॉ. अमोल कोल्हे ( शिरूर), नीलेश लंके (अहमदनगर) अमर काळे (वर्धा), भास्कर भगरे ( दिंडोरी ) यांचा समावेश होता.

# संभाजीराजे - संजय मंडलिक यांच्या भेटीने चर्चांना उधाण

सरवडे: महाविकास आघाडीचे लोकसभेचे उमेदवार शाहू महाराज छत्रपती यांचे सुपुत्र संभाजीराजे छत्रपती व आणि महायुतीचे उमेदवार खासदार संजय मंडलिक आज (दि.४) एकत्र आले. यावेळी हास्य व हस्तांदोलनाने भेट होताच सर्वांच्याच चर्चेचा विषय ठरला. दोन दिग्गजांनी निवडणूक विषयांवर कोणतेही भाष्य न करता अगदी हसतखेळत औपचारिक गप्पा मारल्या. परंतु, या भेटीची जिल्हाभर सोशल मीडियावर चर्चेला उधाण आले आहे. संभाजीराजे व खासदार मंडलिक हे सुनियोजित कार्यक्रमामुळे राधानगरी तालुक्यातील सरवडे येथील गोकुळचे संचालक व बिद्रीचे माजी उपाध्यक्ष लोकनेते स्व. विजयसिंह कृष्णाजी मोरे यांच्या प्रथम पुण्यस्मरणास अभिवादन करण्यासाठी कार्यकर्त्यांसह आले होते. दरम्यान, हे दोघे अचानक एकमेकांसमोर आले. दोघांनी हस्तांदोलन केले. आणि हस्य करत चर्चा केली. दोघांच्या भेटीत काय चर्चा होते, या उत्सुकतेने कार्यकर्ते व उपस्थितीतांनी त्याचभोवती गर्दी केली. परंतु, त्यांनी मैत्री, घरगुती व स्व. विजयसिंह मोरे यांचे कार्य यावरच गप्पा मारल्या. छत्रपती संभाजीराजे यांनी संजय मंडलिक यांनी कपाळावर लावलेला भंडारा पाहून खुणेद्वारे खुणवताच सर्वच हास्यकल्लोळात दंग झाले. त्यानंतर छायाचित्रकारांना पोझ देत उपस्थितांना नमस्कार करत दोघेही मार्गस्थ झाले. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या भेटीमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE